
ISSN: 2393-8900 IMPACT FACTOR : 2.7825(UIF) VOLUME - 7 | ISSUE - 4 | DEC - 2020

HISTORICITY RESEARCH JOURNAL

# “ पेशवे काळातील ब्राह्मण समाजातील हुंडा पद्धतीचा अभ्यास ”



डॉ. संतोषकुमार धनसिंग कांबळे
असोसीएट प्रोफेसर, शहाजीराजे महाविद्यालय, खटाव .

## प्रस्तावना :

छत्रपती शिवाजी महाराजांपासून स्वराज्यात पेशवे पद अस्तित्वात होते परंतु सर्व अधिकार पेशव्यांना छत्रपतींनी बहाल केले नव्हते. छत्रपती संभाजी, छत्रपती राजाराम नंतर छत्रपती शाहूंच्या कालावधीत पेशव्यांना विशेष अधिकार देऊन सर्वोच्च सत्ता छत्रपतींनी आपल्या हाती ठेवली. पेशवे छत्रपतींच्या सल्ल्याने वागत असले तरी छत्रपती शाहूंच्या काळातच सर्व सत्ता पेशव्यांच्या हाती जाऊन छत्रपती नामधारी बनले. पेशव्यांची सत्ता इ.स.1818 मध्ये बाजीराव दुसरा यांच्या काळात ब्रिटिशांनी संपुष्टात आणली.

पेशवे काळात समाजरचना ही वर्णव्यवस्थेवर आधारलेली होती. त्यामुळे वर्णव्यवस्थेचे बहुतेक सर्वच गुण-दोष वर्ण व्यवस्थित असलेल्या रुढी, परंपराना चिकटलेले दिसतात. या अनिष्ट रूढी परंपरा पैकी एक म्हणजे हुंडा पद्धत होय. ही हुंडा पद्धत सर्वच समाजात कमी अधिक प्रमाणात होती त्यापैकी एक समाज म्हणजे ब्राह्मण समाज.

## संशोधनाची उद्दिष्टे :

अ) पेशवे काळातील ब्राह्मण समाजातील हुंडा पद्धत अभ्यासणे.
ब) पेशवे काळातील ब्राह्मण वर्णातील हुंडा पद्धत आणि सध्याची हुंडा पद्धत यांचा तुलनात्मक अभ्यास करणे.
क) हुंडा पद्धत अनिष्ट आहे हे सिद्ध करणे.

## संशोधनाच्या मर्यादा :

‘पेशवे काळातील ब्राह्मण समाजातील हुंडा पद्धतीचा अभ्यास’ या शोधनिबंधाकरिता केवळ पेशवेकाळातील ब्राह्मण समाजातील निवडक आणि काही प्रतिनिधी उदाहरणे व त्यांचा संदर्भ घेऊन सादर केला आहे.

## संशोधन पद्धती :

‘पेशवे काळातील ब्राह्मण समाजातील हुंडा पद्धतीचा अभ्यास’ हा संशोधनाचा विषय विश्लेषणात्मक असल्याने इतिहास संशोधनातील संदर्भ पद्धतीचा वापर प्रस्तुत शोधनिबंधाकरिता केला आहे.

पेशवे काळात ब्राह्मण समाजात हुंडा घेतल्याने काही संदर्भ येतात. नेमका ब्राह्मण समाजात हुंडा का ? कधी ? कशा करता घेतल्या जात होता यावरून सदर संदर्भाची विभागणी करून संदर्भीय हुंडा संदर्भाची मांडणी केली आहे. मांडणी करताना पेशवे काळात न्यायिक प्रशासनाच्या पत्रांचा आधार घ्यावा लागतो. त्यानुसार केलेली मांडणी पुढील प्रमाणे –

**१) जुन्नर प्रांतातील हुंडा पद्धतीचा संदर्भ :**

**अ) जुन्नर प्रांतातील हुंडा पद्धतीचा संदर्भ -** " राजश्री अपाजी कृष्णा गोसावी यासी सेवक बाजीराव रघुनाथ प्रधान नमस्कार सुमा ईहिदे मयातैत व असफ कसबे खेड ता मजकूर प्रा जून्नर येथिल ब्राह्मण जातीत कोणी कन्येचे रुपये घेवून विवाह करू नये जो कन्येचा ऐवज घेईल त्याजपासून दुप्पट व जो देईल त्याने कन्येचे बापास रुपये दिल्हे असतील तितके व मध्यस्थी करून पैका घेईल तो ऐवज त्याजपासून सरकारात घेतला जाईल. याप्रमाणे ब्राह्मण जातीस व जमीदार व धर्माधिकारी व उपाध्ये व जोसी व पाटील कुलकर्णी यास निक्षूण ताकीद करणे ताकीद केली असता आज्ञे प्रो वर्तणूक न करीता त्याजपासून सदहूप्रमाणे ऐवज काही खर्याची बाब न लावीता हिसेबी जमा करीत जाणे जो असे कर्म करून धटाईने पैका न देई त्यास धटाई विसी गावचे पाटील कुलकर्णी यांस साक्षीस ठेवून त्याचे घर जप्त करून वस्तभाव वगैरे व लोकांकडे कर्जनाम येणे असेल ते सदरी लिहीले. बेरजे प्रमाणे वसूल करून हिसेबी जमा धरणेवर ऐवज घ्यावयाचा ठराव लिहला आहे त्या अनवये काही ऐवजाची बाबी राहिल्यास त्यास जातीनीसी त्याचे कुटुंबाबाहेर व गावातून काढून देणे पैका दिलहयावर गावात घेणे याचा वाजवी शोध करणे व पैका माघार देणे.[1] येविसी तुम्ही अब अनमान केल्यास तुमचा ऐवज सरकारात येत असेल तो बुडीवून तुम्हाकडील कामकाजाची घालमेल केली जाईल. विवाह होताच वरचे वर वर पक्षाने व मध्यस्नाने सरकारात तुम्हास समजवावे नंतर येविसीची चौकसी तुम्ही करून कन्या पक्षाने वर पक्षापासून घेतले असेल ते वर पक्षास माघारे देववून कन्या पक्षापासून तितकी गुन्हेगारी सरकारात घ्यावी व मध्यस्थाने घेतले असेल ने मध्यस्तास माफ करावे. वर पक्ष व मध्यस्थ या उभयतानी सरकारात न समजवीता परभारे सरकारात समजल्यास कन्या पक्षाने वर पक्षापासून घेतले असेल ते व तितकी गुन्हेगारी याप्रमाणे सरकारात पो मजगुराकडे द्यावयाचा ठराव करून हे सनद तुम्हास सादर केली आहे. तरी वर लिहल्याप्रमाणे ताकीद करून बंदोबस्त राखून सदरहू समधे वाजबीची चौकसीने जो ऐवज वैगेरे जमा होईल त्यास माही येक खर्चाची बाब न लावीता पो मजकूरी अनामत ठेवून हुजूर समजावणे जाणीचे छ.२२ जमादिलावल आज्ञोप्रमाणे"[2]

**ब) जुन्नर प्रांतातील हुंडा पध्दतीचा दुसरा संदर्भ -** "सेवक बाजीराव रघुनाथ प्रधान नमस्तकार सुभा इहिदे मया तैन व अलफ कसबे कडूस तो. खेड प्रा। जुन्नर येथिल ब्राम्हण जातील कोणी कन्ययचे रुपये घेवून विवाह करू नये जो कन्येचा ऐवज घेईल त्यापासून दुपट वजा होईल त्याणे कन्येचे बापास रूपये दिल्हे असतील जितके व मध्यस्ती करून पैका घेईल तो ऐवज त्याजपासून सरकारात घेतल जाईल याप्रमाणे ब्रामण जातीस न जमीनदार व धर्माधिकारी व उपाध्ये व जोसी व पाटील कुलकर्णी यांस निक्षूण ताकीद केली अपना आज्ञा प्रमाणे वर्तणूक न करीता त्याजपासून सदरहू प्रमाणे ऐवज घेवून काही खर्चाची बाब न लावीता हिसेब जमा करीत जाने जो असे कर्म करून धटाईने पैका न देई त्यास धटाई विसी गावचे पाटील, कुलकर्णी यांस साक्षीस ठेवून त्याचे घर जप्त करून ऐवज घ्यावयाचा ठराव लिहला आहे त्या अन्वये काही ऐवजीचा बाकी राहिल्यास त्याच जातीनिसी त्याचे कुटुंबाबाहेर व गावातून काढूण देणे. पैका फिरतोपर्यंत त्यास गावात येवू न देता त्याची व कुटुंबाची गाट पड़ो न देणे पैका दिल्यावर गावात घेणे.[3] याचा वाजवी शोध करणे व पैका माघारी घेणे येवीस तुम्ही अनमान केल्यास तुमचा ऐवज सरकारात येणे असेल तो बुडवून तुम्हा कडील कामकाजाची घालमेल केली जाईल.

**3) माहुली तालुक्यातील हुंडा पद्धतीचा संदर्भ -**"अखंडीत लक्ष्मी अलंकृत राजमान्य श्री बाजीराव रघुनाथ प्रधान आर्सिवाद सुमा-इसने आशर मयातैन व अलफ ब्राह्मण जातीत कोणी कन्येचा नखत ऐवज वैगैरे देखील कर्जावाम काही वर पक्षापासून न घेता कन्या देवून विवाह करावे तुम्ही तालुके मावूली येथिल धर्माधिकारी व जोसी व उपाध्ये व समस्त ब्राम्हण व देशमुख व देशपांडे व खोत व कुलकर्णी व महाजन यांस ताकीद करावी ताकीद केली असता कन्येचा नख्त ऐवज वगैरे व कर्जवाम घेवून विवाह करीतील त्यास विवाह होताच वरचे वरपक्षाने व मध्यस्थाने सरकारास तुम्हास समजवावे नंतर येबीसीची चौकसी तुम्ही करून कन्या पक्षाने वर पक्षापासून घेतले असेल तर ते वर पक्षास माघारे देववून कन्या पक्षापासून तितकी गुन्हेगारी सरकारात घ्यावी व मध्यस्थाने घेतले असेल ते मध्यस्थ्यास माफ करावे. वर पक्ष व मध्यस्थ या उभयतानी सरकारात न समजविता परभारे सरकारत समजल्यास मध्यस्ती बदल घेतले असेल ते व तितकी गुन्हेगारी या पो सरकारात तालुके मजकुराकडे घ्यावयाचा ठराव करून हे सनद तुम्हास सादर केली असे.[5]

**४) हुंडा पद्धतीचा आणखी दूसरा संदर्भ** असा की, "अखंडीत लक्ष्मी अलंकृत राजमान्य श्री बाजीराव रघुनाथ प्रधान आर्सिवाद सुमा-इसने आशर मयातैन व अलफ ब्राह्मण जातीत कोणी कन्येचा नखत ऐवज वैगैरे देखील कर्जावाम काही वर पक्षापासून न घेता कन्या देवून विवाह करावे या प्रमाणे तुमहि पो गुजरात येथील धर्माधिकारी व जोसी व उपाध्ये व समस्त ब्राम्हण व देशमुख व देशपांडे व खोत व कुलकर्णी व महाजन यांस ताकीद करावी ताकीद केली असता कन्येचा नख्त ऐवज वगैरे व कर्जवाम घेवून विवाह करीतील त्यास विवाह होताच वरचे वरपक्षाने व मध्यस्थाने सरकारास तुम्हास समजवावे नंतर येबीसीची चौकसी तुम्ही करून कन्या पक्षाने वरपक्षाकडून घेतले असेल ते व तितकी गुन्हेगारी व वरपक्षापासून उपर गुन्हेगारी व मध्यस्थापासून मध्यस्ती बदल घेतले असेल ते व तितकी गुन्हेगारी या प्रमाणे सरकारात पो

मजकुराकडे घ्यावयाचा ठराव करून हे सनद तुम्हास सादर केली असे. तरी व लिहिल्याप्रमाणे ताकीद करून बंदोबस्त लावून सदरहू समधे बाजवी चौकसीने जो ऐवज वगैरे जमा होईल त्यास काही येक खर्चाची बाब न लावीता पो मजकुरी आमानत ठेऊन हुजूर समजावणे.[६]

**५) खानदेश प्रांत मधील हुंडा प्रथेचा संदर्भ** असा की, "सेवक बाजीराव रघुनाथ प्रधान नमस्कार सुमा इहिदे मया तैन अलफ महाला निहाय प्रांत खानदेश येथे ब्राह्मणजातीत कोणी कन्येचे रुपये घेवून विवाह करू नये जो कन्येचा ऐवज घेईल त्याजपासून दुपट व जो देईल त्याचे कन्येचे बापास रूपये दिल्हे असतील तितके व मध्यस्थी करून पैका घेईल तो ऐवज त्याजपासून सरकारात घेतला जाईल.[७] या प्रमाणे ब्राह्मण जातीस व जमीदार व धर्माधिकारी व उपाध्ये व जोसी व पाटील, कुलकर्णी यास निक्षून ताकीद केली असता आज्ञेप्रमाणे वर्तणूक न करीत त्याजपासून सदरहू प्रमाणे ऐवज काही खर्चाची बाब न लावीता हिसेबी जमा करीत जाणे जो असे कर्म करून धटाईने पैका न देई त्यांस धटाई वसी गावचे पाटील कुलकर्णी यांस साक्षीस ठेऊन त्यांचे घरजप्त करून वस्त भाव वगैरे व लोकांकडे कर्जवाम येणे असेल ते सदरी लिहल्या अनवये काही ऐवजाची बाकी राहिल्यास त्यास जातीनीस त्याचे कुटुंबाबाहेर व गावातून काढून देणे पैका दिल्यावर गावात घेणे याचा बाजवी शोध करणे व पैका माघारा देणे येविसी माहाला नीहायचे कादारास आलाहीदा सनदा सादर जाल्या आहेत त्या प्रो. ताकीद करून सदरहू प्रो वर्तणूक करवणे येविसी तुम्ही अनमान केल्यास तुम्हाकडील काम काजाची घालमेल केली जाईल.[८]

**६) बारागाव नांदूरचा हुंडा पध्दतीचा संदर्भ** असा की, " पाटील व कुलकर्णी व महाजन देहाचे पो. बारागाव नांदूर सुमा इसाने अशरमया तैन व अलफ ब्राह्मण जातीत कोण्या कन्येचा नख्य ऐवज वगैरे देखिल कर्जवाम काही यके वरपक्षा पासून न घेता कन्या देवून विवाह करावे या प्रमाणे धर्माधिकारी व जोसी व उपाध्ये व समस्त ब्राह्मण व देशमुख व देशपांडे पो मजकुर यांस आज्ञा केली आहे ते ताकीद करीतील ताकीद केली असता कन्येचा नख्त ऐवज वगैरे कर्जवाम घेवून विवाह करतील त्यास विवाह होताच वरचेवर पक्षाने व मध्यस्ताने सरकारांत मामलेदार पो मार यास समजवावे.[९] नंतर ये विसीची चौकसी मामलेदार यांनी करून कन्या पक्षाने वर पक्षापासून घेतले असेल मे वर पक्षास माघारे देववून कन्या पक्षापासून तितकी गुन्हेगारी सरकारात मामलेदार यांनी घ्यावीत व मध्यस्थाने घेतले असे न मध्यस्तास माफ करावे वर पक्ष व मध्यस्थ उभयतांनी सरकारात न समजविता पदभारे सरकारात समजण्यास कन्या पक्षाने वर पक्षापासून घेतले असेल ते व तितकी गुन्हेगारी व वर पक्षापासून दुपट गुन्हेगारी व मध्यस्थ पासून मध्यस्थी बदल घेतले असेल ते व तितकी गुन्हेगारी याप्रमाणे सरकारात पो मजकुराकडे द्यावयाचा ठराव करून मामलेदार पो मजकूर यास अलाहिदा सनद सादर करून हे आज्ञापन तुम्हास सादर केले असे तरी जो कोणी कन्येचा विवाह संबंधाने नख्त ऐवज कर्जवास वगैरे काही घेवून विवाह करील त्याची बातमी तुम्ही बारकाईने चौकसीने राबवून मामलेदार पो मजकूर या साक्षीनसी सांगोन हुजूर विनंती पत्र पाठवीत जाणे.[१०]
जाणीचे छ.२२ जमा दिलोबल कुल आज्ञा प्रमाण."

## निष्कर्ष :

पेशवाईतील ब्राह्मण वर्णातील हुंडा पद्धतीची माहिती घेत असताना असे सिद्ध होते की काही ठिकाणी वर पक्षाकडून वधू पक्षाला हुंडा देण्यात आल्याचे दिसून येते काही ठिकाणच्या संदर्भात वधू पक्षाकडून वर पक्षाला हुंडा देण्यात आल्याचे दिसते हुंडा देण्याचे माध्यम हे रोख स्वरूपाचे होते पेशवाईत सरकारकडून ब्राह्मण वर्णात हुंडा देण्याघेण्याचा पद्धतीला विरोध होता हेही सिद्ध होते हुंडा दिल्या घेतल्याची प्रकरणे समोर आल्यास सरकारने विवाह जमवताना व हुंडा ठरविताना जे मध्यस्थी व हुंडा देणारे घेणारे यांना समज देऊन पुन्हा असे न करण्याची ताकीद /तंबी दिल्याचेही आढळून येते याशिवाय हुंडा देणारे व घेणारे यांच्यावर गुन्हेगारी लावल्याचेही संदर्भातून दिसून येते त्याचबरोबर मध्यस्ती करणाऱ्यांवर मध्यस्ती आकारल्याचेही संदर्भातून दिसून येते हुंड्याची रक्कम ऐवज परत मिळेपर्यंत उभयंताची परस्पर भेट होऊ देत नसत रक्कम ऐवज परत करेपर्यंत गावातील प्रवेश निषिद्ध केल्याचेही संदर्भातून सिद्ध होते अशी प्रकरणे परस्पर न सोडविता सरकारमार्फत सोडवावी हेही स्पष्ट होते हुंडा देऊन घेऊन विवाह जुळत असतील तर त्यावर लक्ष ठेवण्याविषयी सुद्धा सरकारकडून सांगण्यात आलेले दिसते.

सध्याच्या काळात हुंडा देणे व घेण्याला कायद्याने बंदी घातली असली तरी समाजात हुंडा देण्या घेण्याची पद्धत चालू असल्याचे दिसते विशेष वधू पक्षाकडून वर पक्ष हुंडा घेताना दिसतो परंतु एकविसाव्या शतकात मात्र मुलींची संख्या कमी असल्यामुळे वेळप्रसंगी वरपक्षही वधू पक्षाला हुंडा म्हणून नाहीतर वरखर्च म्हणून ठराविक रक्कम दिल्याची भरपूर उदाहरणे समाजात आहेत पूर्वी हुंड्याचे स्वरूप गायीच्या स्वरूपात होते नंतर मात्र पुढील काळात त्याचे स्वरूप बदलत गेले. हुंड्याचे स्वरूप रक्कम रोख रक्कमेत नंतरच्या काळात सोने, घर, गाडी स्वरूपात हुंडा देणे घेण्याचे स्वरूप असल्याचे दिसते. सध्याच्या काळात हुंडा देणे घेण्याचे खूपच प्रस्थ आहे.

असे असले तरी ब्राह्मण वर्णात हुंडा देणे घेण्याची प्रथा असली तरी ती अत्यंत कमी प्रमाणात हुंडा देण्याघेण्याची प्रथा प्रचलित आहे. असे असले तरी ती कायद्याने अपराधाचीच आहे. या सर्वांवर पेशवे काळाचा प्रभावच असेल असे म्हटले तर ते चुकीचे होणार नाही.

**संदर्भ सूची :**


१) डॉ. तांबोळी एन. एस.२००६, पेशवेकालीन न्यायिक प्रशासनाचा पत्ररूप इतिहास,भाग २, इनसाईट पब्लिकेशन, नाशिक पृ.१८५

२) स. नि. का.(१८११) द.क्र.२९ पु. क्र. १, पत्र क्र.०१५९०८

३) स. नि. का.रुमाल नं.३५, पृ.क्र.२, पत्र क्र.१८८३२

४) डॉ. तांबोळी एन. एस.२००६, पेशवेकालीन न्यायिक प्रशासनाचा पत्ररूप इतिहास,भाग २, इनसाईट पब्लिकेशन, नाशिक पृ.१६९

५) कित्ता - पृ.१८७

६) स. नि. का.(१८११) द.क्र.२९, पु. क्र. १, पत्र क्र.१५९१०

७) डॉ. तांबोळी एन. एस.२००६, पेशवेकालीन न्यायिक प्रशासनाचा पत्ररूप इतिहास,भाग २ इनसाईट पब्लिकेशन, नाशिक पृ.१८४

८) कित्ता - पृ.१८४

९) कित्ता - पृ.१८३

१०) कित्ता - पृ.८४